लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३७ वा | सोमवार, दि. २६ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना :- SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग अॅण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग ▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टीवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
३६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025




# विधानसभेला ७ मतदारसंघात अटीतटीची लढत, मंत्र्यांचीच निवडणुकीत होणार दमछाक









**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गेल्या ५ वर्षांत राज्याच्या राजकारणातील अनेक ट्विस्ट आपण पाहिले आहेत. राजकीय तज्ज्ञ तसेच कायदेपंडितांचंही डोकं लॉक होईल अशा घडामोडी या पाच वर्षांत घडल्या आहेत. युती आणि आघाड्यांतील उलटफेर, आमदारांची पळवापळवी, फोडाफोडीचं राजकारण या गोष्टींमुळे राज्यातील राजकारणात मोठी उलथापालथ झाली . २०१९च्या निवडणुकीनंतर अजित दादांना सोबत घेऊन फडणवीसांचं सरकार ८० तासांसाठी सत्तेत आले, त्यानंतर उद्धव ठाकरेंनी शरद पवारांच्या मदतीने राज्यात महाविकास आघाडी सरकार सत्तेत आणले. पुढे एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा गट फुटून भाजपसोबत गेला आणि महायुती सरकार सत्तेत आले. त्यानंतर भाजप पक्षश्रेष्ठींनी एकनाथ शिंदेंना थेट मुख्यमंत्री करून फडणवीसांसह सर्वांनाच धक्का दिला. पुढे राष्ट्रवादीही फुटली आणि अजित पवारही महायुतीत सामील झाले. आता गेल्या अडीच वर्षांपासून शिंदे-फडणवीस-अजितदादांचे महायुती सरकार सत्तेत आहे. सारं काही आलबेल आहे असं वाटत असताना २०२४च्या लोकसभा निवडणुकीनंतर राज्याच्या राजकारणात आणखी एका ट्विस्ट आला आहे. या निवडणुकीत भाजप तसेच महायुतीतील अनेक दिग्गजांना महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी पराभूत केले आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल आणि सध्याच्या राजकारणाची बदलती दिशा पाहता आगामी विधानसभा निवडणुकीतही महायुती सरकारमधील काही मंत्री डेंजर झोनमध्ये आहेत. कोण आहेत ते ७ मंत्री हेच आज आपण आज पाहणार आहोत.

**मंत्री शंभुराज देसाईसाठीही मोठी आव्हानं**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू आणि मंत्री शंभुराज देसाई यांच्यासाठी यंदाची निवडणूक आव्हानात्मक असणार आहे. साताऱ्यातील पाटण मतदारसंघाचे ते प्रतिनिधित्व करतात. या मतदारसंघात देसाई गट विरूद्ध पाटणकर गट हे पारंपारिक प्रतिस्पर्धी मानले जातात. लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी १९५१ ते १९८३ अशी सलग ३३ वर्ष मतदारसंघाचे नेतृत्व केले. त्यांनी राज्याचे गृहमंत्री म्हणूनही काम पाहिले. त्यांच्या निधनानंतर देसाई गट कमकुवत झाला होता. १९८३ ते २००४ अशी सुमारे २० वर्ष पाटणकर गटाची सत्ता होती. दरम्यान १९९७ नंतरच्या काळात आधी बाळासाहेब ठाकरेंनी आणि नंतर उद्धव ठाकरेंनी शंभुराज देसाईंना ताकद दिली. २००४ मध्ये मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचा ५८५१ मतांनी पराभव करत शंभुराज देसाई आमदार झाले. पण २००९ मध्ये विक्रमसिंह पाटणकरांनी पुन्हा बाजी मारत शंभुराज देसाईंचा ५८० मतांनी पराभव केला. त्यानंतर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत विक्रमसिंह पाटणकर यांचे चिरंजीव सत्यजीत पाटणकर यांचा पराभव करत शंभुराज देसाई पुन्हा (पान 2 वर..)

**डेंजर झोनमधील पहिले नाव आहे ते उपमुख्यमंत्री अजित पवार**

वर्षभरापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. शरद पवारांपासून फारकत घेऊन अजित पवार आपल्या समर्थक आमदारांसह महायुती सरकारमध्ये सामील झाले. एवढंच नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावरदेखील त्यांनी दावा केला. पुढं निवडणूक आयोगानं राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ हे निवडणूक चिन्ह अजितदादांना देऊ केले. अजितदादा एवढ्यावरच थांबलेत नाहीत, तर अजितदादांनी बारामती लोकसभा मतदारसंघात सुप्रिया सुळे यांच्या विरोधात आपल्या पत्नी सुनेत्रा पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. निवडणुकीत शरद पवार आणि अजित पवार या दोघांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. सुप्रिया सुळेंनी १ लाख ५८ हजार मतांची आघाडी घेत विजय मिळवला. विशेष म्हणजे अजित पवार आमदार असलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात सुप्रिया सुळेंना तब्बल ४७ हजार ३८१ मताधिक्य मिळाले. अजितदादांसाठी हा मोठा धक्का होता. आगामी विधानसभेच्या दृष्टीनं अजितदादांसाठी ही मोठी डोकेदुखी ठरू शकते. आता लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीतही अजितदादांना घेरण्यासाठी पावलं उचलताना दिसत आहेत. शरद पवार बारामती मतदारसंघात अजितदादांविरोधात त्यांचे पुतणे युगेंद्र पवार यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची शक्यता आहे. युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिली तर शरद पवार लोकसभेप्रमाणेच विधानसभेची निवडणूक हाती घेऊन अजित पवार यांची विधानसभेत जायची वाट बिकट होणार, यात शंका नाही.

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही आपला गड राखणे कठीण**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून सलग पाच वेळा विजय मिळवला आहे. परंतु यंदाच्या लोकसभा निवडणुकीत विदर्भात सपाटून मार खावा लागल्याने भाजपने आता सावध पवित्रा घेतला आहे. या निवडणुकीत देवेंद्र फडणवीसांचा मतदारसंघातून गडकरींना सर्वाधिक मताधिक्य मिळण्याची अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांना ३३ हजार ५३५ इतकेच मताधिक्य मिळाले आहे. त्यामुळे भाजपची चिंता वाढली आहे. २०१४च्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसच्या प्रफुल्ल गुडधे यांचा ५८९४५ मतांनी तर २०१९ मध्ये त्यांनी काँग्रेसच्याच आशिष देशमुख यांचा ४९,३४४ मतांनी पराभव केला होता. परंतु यंदा मात्र राजकीय समीकरणं बदलली आहेत. २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकीमध्ये देशात मोदी लाट होती. या लाटेत काँग्रेस पक्षाची धुळधाण उडाली होती. मात्र यंदा परिस्थिती वेगळी आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने विदर्भातील १० पैकी ८ जागांवर विजय मिळवला आहे. नागपूर मतदारसंघातही काँग्रेसच्या विकास ठाकरे यांनी गडकरी तसेच फडणवीसांची चांगलीच दमछाक केली. या पार्श्वभूमीवर काँग्रेस फडणवीसांना घेरण्याची पूर्ण तयारी करत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, नागपूर मतदारसंघातील काँग्रेसचे दिग्गज नेते सुनील केदार तसेच विकास ठाकरे इत्यादी नेते देवेंद्र फडणवीसांना घेरण्याचा पूर्ण ताकद लावणार यात शंका नाही. अशा परिस्थितीत देवेंद्र फडणवीसांचा यंदाच्या निवडणुकीत निश्चितच कस लागणार आहे.

# देशाच्या प्रगतीसाठी मूल्याधिष्ठित शिक्षण महत्त्वाचे : प्रा. राजीव कुमार

## एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचा प्रथम वर्धापन दिन दिमाखात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात आपल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण प्रदान करण्यासोबतच समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यार्थ्यांमध्ये आदर्श जीवन मूल्याची रुजवात करत आहे. विद्यापीठाचे ध्येय आणि प्रगतीचा आढावा घेऊन भविष्यात विद्यापीठ अधिक उंची गाठेल आणि समाजाच्या प्रगतीसाठी मोठे योगदान देईल. मूल्याधिष्ठित शिक्षण महत्त्वाचे आहे असे गौरवोद्गार ऑल इंडिया काउन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन मेंबर सेक्रेटरी प्रा. राजीव कुमार यांनी काढले.

केगाव येथील एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचा प्रथम वर्धापन दिन सोहळा रविवारी दुपारी मोठया थाटात अन दिमाखात पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या जॉईंट ट्रस्टी डॉ. सुचित्रा कराड - नागरे या होत्या. यावेळी व्यासपीठावर माईर्स एमआयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे बोर्ड ट्रस्टी डॉ. विनायक घैसास, आयआयएम नागपूरचे संचालक प्रा. भीमराया मेत्री, प्रिसिजन कॅमशाफ्ट्सचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, संकल्प सेमीकंडक्टर संस्थापक विवेक पवार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



**देश प्रगत आणि विश्वगुरू होण्यासाठी कष्ट महत्वाचे : डॉ. सुचित्रा कराड - नागरे**

देशाच्या जडणघडणीमध्ये विद्यार्थी हे महत्त्वाचे आहे. महात्मा बसवेश्वर यांच्यासह महापुरुषांच्या आदर्श विचारांची कास धरून विद्यार्थ्यांनी वाटचाल करावी. केवळ प्रगत आणि विश्वगुरू म्हणून चालणार नाही. त्यासाठी कष्ट करण्याची गरज आहे. विद्यार्थी व पालकांनी हे लक्षात घेतले पाहिजे. पालकांनी विद्यार्थ्यांचे कला व छंद जाणून घेऊन त्यांचे करिअर घडविले पाहिजे. शिक्षणाबरोबर छंदही महत्त्वाचे आहेत, असे आवाहन जॉईंट ट्रस्टी डॉ. सुचित्रा कराड - नागरे यांनी केले.

प्रा. राजीव कुमार यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, एम आई टी विश्वप्रयाग विद्यापीठाचे ध्येय समाजाला काहीतरी देणे आणि आपल्या मुल्यांशी जोडून राहणे हे आहे. विद्यापीठाचे संस्थापक प्रा. विश्वनाथ कराड यांनी आपले उच्च माध्यमिक शिक्षण सोलापूरमध्ये पूर्ण केले होते. या विद्यापीठाच्या निर्मितीतुन संस्थेचे संस्थापक प्रा. विश्वनाथ कराड व कार्यकारी अध्यक्ष प्रा. स्वाती कराड-चाटे आपल्या जन्मभूमीशी जोडलेले राहून समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे विद्यापीठ केवळ शैक्षणिक शिक्षण देत नाही तर मूल्य शिक्षणही देत आहे. आदर्श जीवन मूल्याशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड न करण्याची शिकवण हे विद्यापीठ देत आहे. भारतीय संस्कृतीही रुजवली जाते. विद्यापीठ आपल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण प्रदान करण्यासोबतच समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्यापीठाचे ध्येय आणि प्रगतीचा आढावा घेऊन भविष्यात विद्यापीठ अधिक उंची गाठेल आणि समाजाच्या प्रगतीसाठी मोठे योगदान देईल. उच्च शिक्षण संस्थांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे त्यांनी सांगितले.

**ऑपरेशन वसंता आणि चारचाकी फिरत्या इनोवेशन लॅबचे उद्घाटन**

यावेळी अगस्त्य फाउंडेशन आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या सहकार्याने इनोवेशन लॅब, दुचाकी प्रयोगशाळा, ऑपरेशन वसंता आणि चारचाकी फिरते इनोवेशन लॅब या उपक्रमाचे ध्वज फडकावुन उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, अगस्त्य फाउंडेशनचे नितीन देसाई यांनी यासंदर्भात माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात जॉईंट ट्रस्टी डॉ. सुचित्रा कराड - नागरे यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा मांडला. संस्थापक प्रा. विश्वनाथ कराड यांचा कार्य प्रवास सांगितला. त्या पुढे म्हणाल्या, एका इंजिनिअरिंग कॉलेजपासून सुरू झालेला हा प्रवास विद्यापीठापर्यंत पोहोचला आहे. हे विद्यापीठ पाचवे विद्यापीठ आहे. ग्रामीण भागामध्ये संस्था निघाल्या पाहिजे हा उद्देश ठेवला. सर्वांनी आमच्यावर विश्वास दाखवला. या विद्यापीठातून विद्यार्थी सुजाण नागरिक म्हणूनच बाहेर पडतील, असा विश्वास व्यक्त केला. थोर विचारांच्या मान्यवरांनी ही संस्था उभा केली ते लक्षात घेऊन वाटचाल करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. गोपालकृष्ण जोशी यांनी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या उद्दिष्टे आणि प्रगतीचा आढावा घेतला. विद्यापीठ उद्दिष्ट केंद्रीत शिक्षण, उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार तयार केलेले अभ्यासक्रम आणि राष्ट्रीय शिक्षा धोरण यावर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एम आई टी विश्वप्रयाग विद्यापीठ, मिलर्सविले विद्यापीठ, इंडियाना युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिलविया या विदेशी विद्यापीठांशी संलग्नपणे व तसेच कोर्सेरा, इन्फोसिस, स्प्रिंगबोर्ड, सिस्को या ऑनलाईन कोर्सेस प्लॅटफॉर्मशी सहकार्य करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. विद्यापीठातील पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना अर्थ सोल्युशन, इव्या सोलेशन आणि ॲप्पटेले (Apptelay) या कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यापीठाने 2.5 हेक्टर क्षेत्रफळावर मियावाकी वन तयार केले (पान 2 वर..)

# सोलापुरात सव्वादोन कोटींचा खर्च, तरी खड्डयांची डागडुजी नाही

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गणेशोत्सव अवघ्या १८ दिवसांवर आला असताना सोलापूर शहरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे चित्र आहे. ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. तरीदेखील महापालिकेकडून रस्त्यांच्या दुरुस्तीची हालचाल दिसत नाही.

विशेष बाब म्हणजे शहरातील प्रत्येक विभागीय कार्यालयास रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी दरवर्षी २० लाख रुपये तर नगरअभियंता कार्यालयास ७५ लाख रुपयांची तरतूद आहे. तरीदेखील रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे विशेष. एकूण यंदा गणेशोत्सवात सोलापूर शहरातील रस्ते बाप्पासाठी सुद्धा भीतीदायक ठरणार आहेत.

सोलापूर शहरात प्रवेश करताना धर्मवीर संभाजी महाराज चौकातून पुढे मार्गस्थ होताना त्याठिकाणी मोठा खड्डा पडला आहे. पुढे ॲम्बेसेडर हॉटेललगतचा रस्ता व समोरील रस्ताही खराब झाला आहे. पुढे एसटी स्टॅण्डसमोर व छत्रपती शिवाजी महाराज चौकातही मोठा खड्डा पडला आहे. नवीपेठ, पासपोर्ट कार्यालयासमोरील रोड, अक्कलकोट पाण्याची टाकी, अक्कलकोट रोड, शिंदे चौक, रंगभवनजवळील जिल्हा न्यायालयासमोरील रस्ता व पुढे पोटफाडी चौक, गुरुनानक चौकातून अशोक चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरही खड्डे पडल्याची वस्तुस्थिती आहे.



अनेक अधिकारी व शासकीय कर्मचारी दररोज या रस्त्यावरून ये-जा करतात, शाळकरी मुलांचीही याच रस्त्यावरून ये-जा सुरू असते. वाहनांची सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या या रस्त्यांची अशी दुरवस्था झालेली असतानाही महापालिकेकडून खड्डयांची दुरुस्ती होत नसल्याचे गाऱ्हाणे सोलापूरकरांनी मांडले आहे. आता रस्त्यांच्या दुरुस्तीचा विषय महापालिका प्रशासनाकडून किती गांभीर्याने सोडविला जातो, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष आहे.

# सोलापुरात उसाचे क्षेत्र ६० हजार हेक्टरने घटले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येत्या गाळप हंगामासाठी सोलापूर जिल्ह्यात दीड लाख हेक्टर क्षेत्रातील ऊस गाळपासाठी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा जिल्ह्यातील ६० हजार हेक्टर उसाचे क्षेत्र घटले आहे.



राज्यात सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक ऊस क्षेत्रात घट झाल्याचे दिसून येते. त्यामुळे येणाऱ्या गळीत हंगामात साखर कारखान्यांची ऊस गाळपासाठी कसोटी लागणार आहे.

मागील वर्षी पाऊस कमी झाल्याने यंदाच्या उन्हाळ्यात उसासाठी पाण्याची मोठी कमतरता जाणवली. त्यामुळे उसाची म्हणावी तशी वाढ झाली नाही.

राज्यात ऊस उत्पादन घेणाऱ्या सोलापूरसह २७ जिल्ह्यांपैकी २१ जिल्ह्यांत उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर घटले आहे. त्यामुळे ऊस उत्पादनात मोठी घट होणार आहे. सोलापूर जिल्ह्यात मागच्या वर्षी २ लाख १० हजार ९७० हेक्टर उसाचे क्षेत्र होते, यंदा ते १ लाख ५० हजार ५८६ हेक्टरवर आले आहे. साधारण ६० हजार ३७१ हेक्टरने क्षेत्रात घट झाली आहे.

सोलापूर विभागात (सोलापूर व धाराशिव जिल्हे मिळून) सर्वाधिक एक लाख तीन हजार ४६५ हेक्टर उसाचे क्षेत्र घट झाली आहे. गतवर्षीचे राज्यातील हेक्टरी टनेज गृहीत धरले तर राज्यात या वर्षी १८३ लाख टन ऊस उत्पादन कमी होण्याचा संभव आहे. त्या टनेजनुसार सोलापूर जिल्ह्यात ४६ लाख टन, तर धाराशिव जिल्ह्यात ३३ लाख टन ऊस उत्पादनात घट होण्याचा अंदाज आहे.



## संपादकीय

### लैंगिक शिक्षणाचा विचार कधी?

आपण मुलांना मातृभाषा, इंग्लिश, विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल असे अनेक विषय शिकवतो. कसं जेवायचं इथपासून ते चारचौघांत कसं वागायचं हे सांगतो. पण एक शिक्षण दिलं जात नाही.. आणि ते म्हणजे लैंगिक शिक्षण! Instruction in sex is as important as instruction in food जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्यांचं हे वाक्य आठवण्याचं कारण म्हणजे भारतात सतत होणारे बलात्कार. कोलकात्यात जो बलात्कार झाला त्यातील आरोपीने कबूल केले आहे की, बलात्कार करण्याआधी त्याने पॉर्न क्लिप पाहिली होती. अशा क्लिप अगदी शाळकरी वयातील मुलेही फक्त एक क्लिक करून पाहू शकतात. सिनेमांना जसं सेन्सॉर बोर्ड असतं तसं पॉर्नला नसतं. अशा फिल्म्सवर भारत सरकारचं नियंत्रण नाही. कारण यातील बहुतांश क्लिप विदेशात तयार होतात आणि ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या जातात. या फिल्म प्रौढ व्यक्तींपुरत्या मर्यादित नाही. त्या कोणीही पाहू शकते.

**लैंगिक शिक्षणाचा अभाव**

मुलांना लैंगिक शिक्षण का द्यायचं? कारण चुकीचं ज्ञान अज्ञानापेक्षा घातक असतं. योग्य लैंगिक शिक्षण दिलं तर मुलांकडून त्याचा योग्य स्वीकार होईल. मुलांना जेव्हा शरीरात आणि मनात प्रचंड बदल जाणवत असतो, तेव्हा त्यांना प्युबर्टी ही अवस्था नैसर्गिक असून इतरांसारखी ती माझ्यात आली आहे हे समजेल. मुले आपल्यापरीने लैंगिकता जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. मित्र, इंटरनेट या माध्यमातून माहिती मिळवतात. ही माध्यमे त्यांच्या भावना आणखी चेतावतात आणि ते सीमारेषा ओलांडायला उद्युक्त होण्याची शक्यता असते. लैंगिकतेसंबंधी काही विकृती जन्माला येतील. त्यातील एक भयंकर विकृती आहे, बलात्कार! कायदा बलात्कार झाल्यावर न्यायनिवाड्याचं काम करतो; पण बलात्कार थांबवणं कायद्याच्या कक्षेबाहेरचं आहे. बलात्कार किंवा इतर विकृती थांबवण्यासाठी प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक पालक आणि मुलांना लैंगिकतेची मूलभूत माहिती असायला हवी. लैंगिक साक्षरतेचं प्रमाण वाढायला हवं. सिग्मंड फ्रॉईड म्हणतो, बाळ जन्माला येतं तेव्हा त्याच्यासोबत कामभावना, लैंगिक इच्छा जन्माला येते. बाळ एखाद्या वस्तूत रमून शारीरिक आनंद मिळवत असतं. या अवस्थेला फ्रॉईडने पॉलिमॉर्फिक परव्हर्स असं नाव दिलं. बाळ मल-मूत्र विसर्जन करतं, शी-सू करतं तेव्हा त्याला शारीरिक आनंद मिळतो. ही अवस्था वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत टिकते. त्यानंतर बाळ (मुलगा आणि मुलगी) ओडिपस कॉम्प्लेक्सपर्यंत येतं. सोप्या भाषेत सांगायचं तर मुलाला किंवा मुलीला भिन्नलिंगी पालकाबद्दल किंवा संपर्कात येणाऱ्या भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण निर्माण होतं. लैंगिकतेच्या एकूण चार अवस्था असतात. स्व-कामप्रेरणा, समलिंगी कामप्रेरणा, भिन्नलिंगी कामप्रेरणा आणि वार्धक्यातील कामप्रेरणा नसलेलं जीवन. बाळ जन्माला आल्यानंतर ते या चार अवस्थांमधून जातं. आता विचार करू, बलात्कार करण्याची जास्त शक्यता केव्हा असते?

निसर्गानं लैंगिक संबंधांमधून पुढची पिढी अपेक्षित असते. त्यामुळे निसर्गानं लैंगिकतेची भावना खूप लहान वयात निर्माण केलेली असते. मेंदूमधून रासायनिक संदेश पाठवला जातो आणि पुरुषाला (लहान मुलालासुद्धा) लैंगिक इच्छा होते. ही क्रिया शिकवावी लागत नाही. आपोआप घडते. स्वप्नामध्ये लैंगिक दृश्ये दिसू लागतात. मुलगा मोठा होत जातो तेव्हा अनेक माध्यमांतून त्याला लैंगिकतेची माहिती मिळत जाते. मित्रांकडून मिळणारी (साधारणपणे अपुरी/चुकीची) माहिती त्याच्या मेंदूत साठवली जाते. हल्ली प्रसारमाध्यमं सगळ्यांच्या हातात आहेत. त्यावर काय दाखवलं जातं? इंटरनेटवर यासंबंधांमध्ये जे व्हिडिओ किंवा क्लिप्स आहेत त्यांचं वर्णन हे 'अवर्णनीय' आहे. लहान मुलांच्या हाताला असे व्हिडिओ सहज लागू शकतात.

आता प्रश्न येईल, अशा गोष्टींपासून आपल्या मुलाला कसं वाचवायचं? स्त्रीचा सन्मान राखणं, बलात्कार का होतात आणि त्यापासून दूर राहणं हे मुलांना समजावणं इत्यादी उपाय आहेत. कमी वयाच्या मुलांना लैंगिकतेची योग्य माहिती देणारी हेल्पलाइन तयार करावी लागेल. नाव न विचारता, विचारलेल्या प्रश्नावर योग्य उत्तर देणारी एक हेल्पलाइन अनेक तरुणांच्या इच्छेचं शमन करू शकते... दमन नाही! दमन म्हणजे ऊर्जा दाबणेङ्क भौतिकशास्त्र सांगतं की ऊर्जा दाबली की तिचा स्फोट होतो. सध्या तेच होत आहे. मीडियामधून लैंगिकतेची इच्छा तीव्र केली जाते. तरुण मुले बलात्काराकडे वळू नयेत म्हणून फ्राइडचा सिद्धांत कामाला येऊ शकतो. लहान मुलं शारीरिक आनंद लुटतात.. मल-मूत्र विसर्जन करूनसुद्धा! मग शारीरिक आनंद लुटण्यासाठी खेळाचं मैदान हा आणखी एक हुकमी उपाय आहे. फुटबॉलला लाथ मारल्यावर सगळी ऊर्जा बाहेर निघते. पोहणं, सायकलिंग, ट्रेकिंग असे खेळ मोठा परिणाम करू शकतात. पण मैदाने संपली, मुलं कॉम्प्युटर गेम खेळायला लागली. शारीरिक आनंद लुटण्याचे मार्ग बंद झाले आणि बलात्कार वाढत गेले, असे म्हणायला वाव आहे. दुर्दैवाने लैंगिकता हा विषय अश्लील समजला जातो. लैंगिकतेचं शिक्षण स्पष्ट, रोखठोक स्वरूपात दिलं जात नाही. डूज आणि डोन्ट्स सांगणारी अनेक उत्पादने विकली जातात, पण लैंगिकतेबद्दल डूज आणि डोन्ट डू सांगायची वेळ आली आहे का, याबाबतही विचार व्हावा.

लैंगिकतेचं योग्य ज्ञान देण्यासाठी र. धों. कर्वे यांनी 'समाजस्वास्थ्य'नावाचं मासिक सुरू केलं होतं. जुलै 1927 ते 1953 पर्यंत ते चालवलं. अनेक अश्लीलतेच्या कोर्ट खटल्यांमध्ये त्यांना दंड झाला. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे ऊर्फ रँग्लर परांजपे यांनी कर्वेंना साथ दिली. स्त्रियांनादेखील लैंगिक भावना असतात असा विचार कर्वेंनी मांडला, जो अनेकांना पचला नाही. कर्वेंची हेटाळणी होत राहिली. ते विल्सन महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक होते. लैंगिक विषय जाहीरपणे मांडणे विल्सन महाविद्यालयाला पटलं नाही. त्यांनी प्रा. कर्वेंना राजीनामा द्यायला लावला. कर्वेंचा राजीनामा मागणे ही ऐतिहासिक चूक होती. जिचे परिणाम समाजाला आजही भोगावे लागत आहेत. आजही लैंगिक हा विषय जाहीरपणे बोलला जात नाही, त्यावर लिहिले जात नाही आणि चर्चा होत नाही. आता अशा चुका टाळल्या तर बलात्कार, लैंगिक अत्याचार रोखता येतील. म्हणूनच बलात्कार की लैंगिकतेच्या वस्तुस्थितीचा स्वीकार? कठोर कायद्याची मागणी करणार की आणि लैंगिक शिक्षणाचाही विचार करणार? निवड आपल्या हातात आहे.

## विधानसभेला ७ मतदारसंघात...

असून पुढील तीन वर्षांमध्ये ५० हजार वृक्षरोपण करण्याचा निश्चय केला आहे. विद्यापीठात डिझाईन थिंकिंग फॉर सस्टेनेबिलीटी ( Design Thinking for Sustainability) आणि कैवल्य धाम या संस्थेच्या सहकार्याने वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत, असे सांगितले.

स्वागतपर भाषणात प्रकल्प संचालिका प्रा. प्रभा कासलीवाल म्हणाल्या, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांनी सोलापूर येथे विद्यापीठ स्थापनेत प्रमुख भूमिका बजावली आहे. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ आता सोलापुर शहरातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिक्षण प्रदान करण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले. याप्रसंगी श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. विश्वशांती प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रा. ट्विंकल शुक्ला यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्राणेश मुरनाळ यांनी आभार मानले.

यावेळी विभाग प्रमुख, प्राध्यापक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भेदरलेली भारत'माता'




शिशिर देशभरात नुकताच ७८ वा स्वातंत्र्यदिन जल्लोषात पार पडला. ब्रिटिशांच्या गुलामीतून मिळालेले स्वातंत्र्य हा तमाम देशवासियांसाठी मोठ्या अभिमानाची गोष्ट म्हणावी लागेल. मात्र ७८ वर्षे उलटल्यावरही खरंच प्रत्येक घटकाला स्वातंत्र्य मिळाले आहे का हा संशोधनाचा विषय आहे. त्यातही देशाच्या प्रगतीत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून योगदान देणाऱ्या देशातील महिलांना खरंच सुरक्षित आणि स्वतंत्र वाटतं का हे मोठे प्रश्नचिन्ह आहे. देशात सातत्याने वाढणाऱ्या बलात्कार आणि अत्याचाराच्या घटना महिलांच्या स्वातंत्र्यावर एकप्रकारे घाला घालत आहेत.

नुकतीच कोलकत्यात घडलेली बलात्काराची घटना, बदलापूरमधील चिमुरडीवरील अत्याचाराची घटना हेच अधोरेखित करतात की लहान असो किंवा मोठी, कोणतीही महिला आज सुरक्षित नाही. स्वतंत्र भारतात आजही महिलांना त्यांचे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी झगडावे लागत आहे. महिला घराबाहेरही आणि घरातही असुरक्षितच आहेत. त्यांच्यावरील लैंगिक गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे.

परवा बसमधून प्रवास करत असताना तरुण मुलांचे एक टोळके बसमध्ये शिरले. त्यांच्यात मोठ्याने गप्पा-गोष्टी, हसणे खिदळणे चालले होते. त्यांच्या संवादातील एक वाक्य माझ्या कानावर पडले जे अनपेक्षित होते. त्यातील एकजण बोलला , 'इथे एखादी सुंदर मुलगी असती तर सगळ्यांचा प्रवास चांगला झाला असता.' मी त्यांच्याकडे मागे वळून पहिले परंतु अपराधी पणाचा कसलाही भाव त्यांच्या चेहऱ्यावर नव्हता. देशाचे भविष्य समजले जाणारे असे तरुण आणि एखादा महिलांवर अत्याचार करणारा आरोपी यांच्यात मला काहीही फरक जाणवत नव्हता. त्या बसमध्ये बसलेले इतर प्रवासी आणि विशेषतः महिला देखील यावर व्यक्त झाल्या नाहीत याची खंत मला जाणवली. आणि आपण स्वतःही यावर काही बोलला नाही याचे शल्य काहीवेळाने बोचत राहिले. तिथेच समजले की आजचा पुरुषी समाज महिलांकडे पाहण्याचा काय दृष्टिकोन बाळगतो ते.

निर्भया प्रकरण, मणिपूर प्रकरण, आताचे कोलकाता हत्याकांड आणि दररोज वाढणारे महिला अत्याचार या भारतमातेच्या, माता भगिनींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. स्त्रियांचे स्वातंत्र्य म्हणजे फक्त कपडे निवडण्याचे स्वातंत्र्य, अभ्यासाचे स्वातंत्र्य किंवा करिअर निवडण्याचे स्वातंत्र्य इथपर्यंतच मर्यादित राहिले आहे. मुक्तपणे संचाराचे स्वातंत्र्य आजही तिच्या वाट्याला आले नाही ही या विकसनशील देशासाठी मोठी शोकांतिका आहे.

तसे पाहता स्वतंत्र भारतातही अजूनही महिला पूर्णपणे स्वतंत्र झालेल्या नाहीत. आजही महिलांना त्यांच्या आवडीचे शिक्षण किंवा नोकरी निवडण्यापूर्वी प्रथम त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संमती घ्यावी लागते. समजा, एखाद्या मुलीला ॲडव्हेंचर सारख्या क्षेत्रात जायचे असेल, तर प्रथम तिला तिच्या घरच्यांना पटवून देण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. यात त्या पालकांचाही दोष नाही. तिच्या कुटुंबीयांच्या मनात ती घराबाहेर सुरक्षित राहील का? अशी भीती सतत सतावत असते. अलीकडच्या काळात ज्या प्रकारे महिलांवरील लैंगिक अत्याचाराची प्रकरणे वाढली आहेत त्यामुळे ही भीती अधिक दृढ झाली आहे. आणि त्यातही तिलाआचारस्वातंत्र्य देत घरच्यांनी परवानगी दिली तरी समाज तिच्याबाबत शंकाकुशंका व्यक्त करतो. जोपर्यंत स्त्री स्वतःचे नाव आणि प्रतिष्ठा निर्माण करत नाही तोपर्यंत तिला समाजात स्वीकारले जात नाही. अशी इतर अनेक क्षेत्रे आणि अनेक गोष्टी आहेत ज्यात जाण्यापूर्वी तिला खूप विचार करावा लागतो. मग हे असे असताना आपण तिलाही स्वातंत्र्य मिळाले आहे असे कसे बरं म्हणू शकतो.

महिलांवरील लैंगिक अत्याचार हल्लीचेंच नाहीत तर फार पूर्वीपासून सुरू आहेत. परंतु गेल्या दोन दशकांत त्यात झालेली वाढ चिंताजनक आहे. यासाठी सरकारने कितीही कायदे केले तरी ते प्रत्येक गुन्हेगारापर्यंत पोहोचू शकत नाही किंवा प्रत्येक महिलेच्या वेदना जाणून घेऊ शकत नाही. त्यासाठी समाजाला पुढे येऊन ही समाज व्यवस्थाच बदलावी लागणार आहे. जोपर्यंत स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही तोपर्यंत हे थांबू शकत नाही. तिला मुक्तपणे जगण्याचे, आचार, विचार आणि संचाराचे स्वातंत्र्य देणे ही प्राथमिक गरज आहे. आणि यासाठी एक बाप, भाऊ, नवरा, मित्र म्हणून आपल्याला ही जबाबदारी खांद्यावर घ्यावी लागणार आहे. तिच्या भयमुक्त जगण्यासाठी सामाजिक प्रबोधन करून एक क्रांती घडवावी लागणार आहे.

**लेखक : सागर न. ननावरे, पुणे**
स्तंभलेखक
9657991677
www.sagarnanaware.blogspot.com

पान १ वरून

## विधानसभेला ७ मतदारसंघात...

आमदार झाले. सध्या शंभुराज देसाईचं राज्यातील वजन चांगलंच वाढलं आहे. सध्या ते महायुती सरकारमध्ये राज्य उत्पादन शुल्क मंत्री तसेच साताऱ्याचे पालकमंत्रीदेखील आहेत. त्यांनी आपल्या मतदारसंघात मोठा निधी आणला आहे. परंतु त्याचवेळी पाटणकर यांनी नगरपालिका जिंकत शंभुराज देसाईंना धक्का दिला आहे. तसेच जिल्हा बँकेतही शंभुराज देसाईंचा पराभव केला आहे. महाविद्यालय तसेच येऊ घातलेल्या शुगरकेन प्रकल्पातून त्यांनी अर्थकारणावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामुळे यंदा शंभुराज देसाईपुढे पाटणकरांचे तगडे आव्हान असणार आहे. यातच पक्षफुटीनंतर शंभुराज देसाईनी शिंदे गटाची साथ दिल्याने ते उद्धव ठाकरेंच्या ते रडारवर आहेत. तसेच आपल्या विश्वासू उमेदवाराला ताकद देण्यासाठी शरद पवारही मैदानात उतरणार हे निश्चित आहे. परिणामी शंभुराज देसाईची यंदाची विधानसभेपर्यंतची वाट आव्हानात्मक असणार आहे.

**मंत्री चंद्रकांत पाटलांच्या मतदारसंघात भाजपातच नाराजीनाट्य**

राज्याचे उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कोथरूड विधानसभा मतदारसंघावर भाजपचेच माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी दावा केला आहे. कोथरूडमधून आगामी विधानसभा निवडणूक लढण्याची यांनी बालवडकरांनी तयारी सुरु केली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन सुरू केले आहे. स्वपक्षातून विरोध होऊ लागल्याने चंद्रकांत पाटील यांची विधानसभेपर्यंतची वाट बिकट बनली आहे. भाजपने कोथरूड विधानसभा मतदारसंघातून इच्छुक असलेल्या मुरलीधर मोहोळ आणि माजी आमदार मेधा कुलकर्णी यांना दिल्लीत संधी दिल्याने यावेळी देखील कोथरूडमधून चंद्रकांत पाटलांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. परंतु अमोल बालवडकर यांनी या मतदारसंघावर दावा केल्याने चंद्रकांत पाटलांची डोकेदुखी वाढली आहे. बालवडकर यांनी कोथरूड भागात जनसंपर्क कार्यालय थाटले असून शहरात होम मिनिस्टर, लाडकी बहीण योजनेची माहिती सांगणारे रथ फिरवत मतदारसंघात सक्रिय झाले आहेत. यामुळे येणाऱ्या काळात या मतदारसंघावरून भाजपकत बंडाळी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या परिस्थितीत फायदा घेत अचूक रणनिती आखल्यास महाविकास आघाडी चंद्रकांत पाटलांसमोर चांगले आव्हान निर्माण करू शकते.

**नाराज नेत्यांमुळे विजयकुमार गावितविरोधी वातावरण**

आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांच्यासाठीही यंदाची निवडणूक अटीतटीची असणार आहे. नंदुरबार जिल्ह्यावर अनेक वर्षापासून गावित परिवाराचं वर्चस्व आहे. परंतु वर्चस्वाला लोकसभा निवडणुकीपासून हादरे बसण्यास सुरुवात झाली आहे. माजी खासदार हिना गावित लोकसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर आता आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांची दुसरी मुलगी सुप्रिया गावित यांचे जिल्हा परिषद अध्यक्षपद देखील धो क्यात आले आहे. जिल्ह्यातील संपूर्ण सत्ताकेंद्रे गावित परिवाराकडे एकवटल्याने त्यांच्याविरोधात स्वपक्षातील अनेकजण नाराज आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणूकीत या नाराज मंडळींनी उघडपणे काँग्रेस उमेदवाराची साथ दिली होती. हीच परिस्थिती विधानसभा निवडणुकीत कायम राहिल्यास विजयकुमार गावित यांची विधानसभा निवडणुकीत दमछाक होणार हे नक्की.

**मंत्री दादा भुसेंची निवडणूक आव्हानात्मक**

सार्वजनिक बांधकाममंत्री दादा भुसे यांना आगामी विधानसभा निवडणूक आव्हानात्मक ठरू शकते. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत प्रस्थापित हिरे घराण्याच्या साम्राज्याला सुरुंग लावून भुसे मालेगाव बाह्य मतदारसंघाचे आमदार झाले. त्यानंतर त्यांनी या मतदारसंघात आपले वर्चस्व कायम राखले होते. परंतु यंदा मात्र त्यांच्यासमोर त्यांचेच एकेकाळचे खंदे समर्थक बंडू बच्छाव यांचे त्यांच्यासमोर तगडे आव्हान असू शकते. बंडू बच्छाव यांनी शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारीवर दावा केल्याने दादा भुसेंसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. मागील विधानसभा निवडणुकीत त्यांच्याविरोधात काँग्रेसचे तुषार शेवाळे रिंगणात होते. शेवाळे यांचा ४८ हजार मतांनी पराभव केला. परंतु यंदा मात्र शिवसेनेत फूट पडल्याने त्यांची शिवसेनेची ताकद विभागली गेली आहे. याशिवाय त्यांचेच सहकारी त्यांच्याविरोधात उभे राहिल्यास त्यांना आणखी फटका बसू शकतो. इतकी वर्ष आमदार असल्यामुळे दादा भुसेंना अँटीइन्कबन्सीचा देखील सामना करावा लागू शकतो, असे राजकीय विश्लेषक सांगतात.

**मंत्री छगन भुजबळांसाठी मराठा आरक्षणविरोध ठरु शकते डोकेदुखी**

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ आमदार आणि मंत्री छगन भुजबळ यांना यंदाची निवडणुक खूप कठीण असणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर छगन भुजबळ अजित पवारांसोबत गेले. एवढंच नाहीतर अनेक सभांमध्ये त्यांनी शरद पवारांविरोधात आक्रमक भाषणं देखील केली आहेत. त्यामुळे छगन भुजबळ आता शरद पवारांच्याही रडारवर असणार आहेत. येवला मतदारसंघाचा इतिहास पाहता तो कायमच शरद पवारांसोबत राहिला आहे. त्यामुळे यंदा छगन भुजबळांचा कस लागणार हे नक्की. याशिवाय मनोज जरांगे पाटील यांना अंगावर घेणेही भुजबळांना महागात पडू शकते. मराठा आरक्षणविरोधी भुमिकेमुळे भुजबळांना मराठा समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागू शकते. मनोज जरांगे पाटील यांनी तर छगन भुजबळांना येवला मतदारसंघात पाडणारंच, असा निर्धार केला आहे. याशिवाय त्यांच्याविरोधात मतदासंघात अँटीइन्कम्बन्सीही दिसून येत आहे. त्याचाही फटका त्यांना बसू शकतो. त्यामुळे भुजबळांची यंदाची विधानसभेची वाट सुलभ नाही असेच दिसत आहे.

## प्रबोधन

# जगी आहे मोठी। संख्या आंधळ्यांची

'जगात आंधळेच फार आहेत' असं एकदा बिरबलाने अकबराला ऐकवलं. तेव्हा बादशहाने ते सिध्द करायला सांगितलं. बिरबल अकबराला एका विणकराच्या दुकानात घेऊन गेला. विणकर कापड विणत असताना एक जण तिथे येऊन म्हणाला, 'काय चाललंय, सदोबा ?' सदोबा म्हणाला, 'बसलोय विणत.' थोड्या वेळाने दुसरा आला. तोही म्हणाला, 'काय चाललंय?' सदोबाने पुन्हा तेच उत्तर दिलं. तासाभरात दहाजणांनी 'काय चाललंय?' हा प्रश्न सदोबाला विचारल्यावर बिरबल म्हणाला, 'खाविंद, सदोबा विणतोय हे पाहूनही सर्वजण विचारतायत, 'काय चाललंय?' म्हणजे ती आंधळीच नाहीत काय? बादशहाने बिरबलाचं तत्त्व मान्य केलं.

मराठी साहित्यात दिवाकर कृष्ण नावाचे एक कथालेखक होऊन गेले. त्यांची 'अंगणातला पोपट' ही गोष्ट मराठी साहित्यातील एक अलंकार मानली जाते. ही गोष्ट संपत्तीच्या हव्यासाने आंधळ्या झालेल्या बापावर आधारलेली आहे. आईविना पोरका, एकुलता एक बच्चा 'पोपट' पितृसुख तरी मिळावं म्हणून पैशाच्या आकडेमोडीत गुंतलेल्या बापाच्या दारात तिष्ठतो. पण चार वेळा प्रयत्न करूनही वडिलांची भेट मिळत नाही म्हणून माज्यावर सारेच रागावलेत असं म्हणत तापाने फणफणतो व हे जग सोडून हा पोपट कायमचा अज्ञातात मिसळून जातो. आंधळ्या वृत्तीने घेतलेला हा निरागस बळी वाचकांना असह्य दुःख देतो. पोपटच्या वडिलांसारखे कितीतरी आंधळे रोज भेटतात. म्हणजे बिरबल म्हणाला ते काही खोटं नव्हतं.

जन्मांध हा प्रकार निसर्गजन्य असतो, पण सत्तांध, कामांध, मदांध, स्वार्थांध, धनांध, जात्यांध, तत्त्वांध, निष्ठांध हे अंधप्रकार मात्र समाज आणि परिस्थितीजन्य आहेत. यातील काही शब्द रूढ, परिचित आहेत. तर सत्तांध, कामांध, मदांध, स्वार्थांध हे प्रकार मानवी मनाच्या विकृतीवर आधारलेले नवसंस्कृतीजन्य आहेत.

जीवनाच्या निकोपपणाचा बळी घेणाऱ्या काही विकृतींचा नव्याने शोध लागतो. तात्त्विकपणा किंवा तत्त्वनिष्ठा हा परंपरेने सद्गुण मानला असला, तरी तत्त्वानेही काही माणसं अंध होतात. स्वदेशीचा प्रचार महात्माजींनी केला, तेव्हा अनेक देशभक्तांनी इंग्लंडहून येणारे चहा, कॉफी, चप्पल-बूट, घड्याळ सारे सोडले! इंग्लंडच्या गिरणीतून येणारं कापड, अगदी मँचेस्टरचं मांजरपाटही वापरणं सोडलं. चादर-ब्लँकेट विदेशी म्हणून टाकून, देशी घोंगडी अंथरायला-पांघरायला घेतली. मेड इन इंग्लंड छापाच्या छत्र्याही टाकल्या. पावसाळ्यात हे तत्त्वनिष्ठ लोक घोंगडीची खोळ करून पावसापासून आपला बचाव करायचे. साखर आपल्या देशात होत नव्हती म्हणून गुळाचा चहा प्यायचे. त्यांची स्वदेशीनिष्ठा अशी प्रखर झालेली असतानाच देशाला स्वातंत्र्य मिळालं. स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंनी उद्योगधंद्याला चालना दिली. १०-१२ वर्षांत देशात रेल्वे इंजिनपासून सुई-टाचणीपर्यंत व चहा-कॉफीपासून छत्रीपर्यंत सारं उत्पादन होऊ लागलं. पण तत्त्वाने आंधळे झालेल्यांनी देशी छत्रीही नाकारली. ॲलोपॅथीची औषधं न घेता कित्येकांनी मृत्यू पत्करला. याला म्हणावं तत्त्वांधता. हा रोगही बरा न होणाराच. परिस्थितीमुळे होणारे, झालेले बदल कळायला मनाचा डोळसपणा लागतो.

रजपूत लोक शूर; पण तेही शौर्याच्या फाजील कल्पनेने अंध झालेले होते. पतीमध्ये शौर्य निर्माण करणे, हा रजपूत स्त्रियांचा धर्म मानला जाई. युद्धातून पळून येणाऱ्यांना त्या भ्याड समजत. एक नवविवाहित पती ऐन युद्धातून पत्नीच्या आठवणीने व्याकुळ होऊन घरी आला. तेव्हा तत्त्वांध पत्नीने त्याला स्नान घालण्याचं नाटक करून त्याच्याच तलवारीने त्याचं शिर धडावेगळं केलं. तत्त्वनिष्ठा आंधळी असल्यावर तिला चांगलं कसं आणि कुठून दिसणार? म्हणून विवेकाचे डोळे उघडे ठेवून जगणं, हेच खरं जीवन!

जगी आहे मोठी। संख्या आंधळ्यांची
गोष्ट बिरबलाची । खोटी नाही ॥ १
दिसतसे फक्त खुर्ची सत्तांधाना
काहीही दिसेना। भलेबुरे ॥२
स्वार्थांधांना पिता । पुत्रही दिसेना
स्वार्थ साधताना । होती नीच ॥३
कामांधांना ध्यान । सदा वासनेचे
पवित्र नात्याचे । भान नाही ॥४
मदांध साऱ्यांना । कस्पट मानतो
कोणी न दिसतो। त्यास थोर ॥५
श्रद्धांध भाविका । फक्त देव दिसे
बळी तो देतसे। लेकराचा ॥६
धर्मांधांनी केले। जगाचे वाटोळे
अन्य धर्मी झाले । बळी त्यांचे ॥७
तत्त्वांधाना नाही। व्यवहारज्ञान
झाले नुकसान। संसाराचे ॥८
आंधळे न जाती। घेण्या उपचार
अंधत्वास दूर। करीनात ॥९
अंधांना वाटावे । प्रेम अंधत्वाचे
दुर्दैव जगाचे। खरे हेच ॥ १०



प्रा. डॉ. जी. बी. शिंदे

# प्रा. रामदास झोळ फाउंडेशनच्यावतीने करमाळा तालुक्यातील युवक युवतीसाठी ३० ऑगस्टला भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन

**वाशिंबे (सचिन भोईटे):-** करमाळा तालुक्यातील युवकांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी त्यांचे जीवन आत्मनिर्भर करण्यासाठी प्रा.रामदास झोळ फाउंडेशन च्या वतीने ३० ऑगस्टला करमाळा येथील विकी मंगल कार्यालय येथे भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ सर यांनी दिली आहे.




पुढे बोलताना ते म्हणाले की करमाळा तालुक्यातील प्रत्येक युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी युवा युवती आणि त्यांचे पालक जागरूक असतात. परंतु वाढत्या स्पर्धेमुळे योग्य वेळी संधी मिळवून देण्यासाठी त्यांचे जीवन स्वावलंबी आत्मनिर्भर करण्यासाठी आम्ही फाउंडेशनच्या वतीने अनेक वर्षापासून नोकरी महोत्सवाचे आयोजन करून युवक युवतींनी रोजगार मिळवून देण्यासाठी काम करत आहोत. या नोकरी महोत्सवामुळे दत्तकला शिक्षण संस्था याचबरोबर विविध शिक्षण संस्थामधुन शिक्षण पुर्ण करुन बेरोजगार यूवक युवतींना नोकरी मिळाली आहे.यामुळे त्यांचे जीवन समृद्ध झाले आहे.


यावर्षीही करमाळा शहर व परिसरातील सुशिक्षित व होतकरू युवक-युवतींसाठी नोकरी महोत्सव या संकल्पनेतून नोकरीची सुवर्णसंधी मिळवूण देण्यासाठी ५० पेक्षा जास्त कंपन्यांचा सहभाग असलेला भव्य नोकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

यामध्ये Manufacturing, Banking, Finance, Retail, BPO, KPO, Healthcare, Security, Hospitality, Real Estate, Automobile, Pharma, IT ई. क्षेत्रातील नामवंत कंपन्यामध्ये तरुण- तरुणींना सुवर्णसंधी यामध्ये कमीत कमी शैक्षणिक पात्रता ५ वी पास पासून ते १० वी, १२ वी, पदवीधर, पदव्युत्तर, क्ळक डिप्लोमा ई. विविध शिक्षण घेतलेले युवक-युवतीं सहभागी होऊ शकतात. (वय १८ ते ३२ पर्यन्त ) शुक्रवार दिनांक ३० ऑगस्ट २०२४

ठिकाणः- विकी मंगल कार्यालय एसटी स्टँड शेजारी करमाळा जिल्हा सोलापूर वेळ. स.१०.०० ते सायं. ४.०० वाजे पर्यत नाव नोंदणीसाठी लिंक https://maharashtrajobfair.com/proframdaszol या नोकरी महोत्सवामध्ये करमाळा शहर व तालुक्यातील युवक युवतींनी सहभागी होऊन सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ सर व सचिवा मायाताई झोळ मॅडम यांनी केले आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात ही सोलापुरातून झाली ही बाब देशात आणि महाराष्ट्र शासनापर्यंत पोहचावी - सुधीर खरटमल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सवाचा 2023/24 बक्षीस वितरण समारंभ शिवानुभव मंगल कार्यालय येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल तर प्रमुख उपस्थिती ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे, माजी महापौर शोभाताई बनशेट्टी, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, ट्रस्टी सदस्य सुनिल रसाळे, ट्रस्टी सदस्य नरसिंग मेंगजी, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल (बापु) शिंदे, हेमाताई चिंचोळकर उत्सव अध्यक्षा लताताई फुटाणे, सामाजिक कार्यकर्ते श्रीशैल बनशेट्टी, यांच्यासह मंडळाचे विश्वस्त पदाधिकारी उपस्थित होते अध्यक्षीय भाषणात बोलताना ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल म्हणाले की सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात ही सोलापुरातून झाली ही बाब देशात आणि महाराष्ट्र शासनापर्यंत पोहोचावी असे मत त्यांनी व्यक्त केले.



## वात्रटिका

### धुरीणांचे धोरण

किती गोडवे गायले होते
कणखर आणि होता राकट...
आता काय दशा केली आणि
यांनी लावली फरफट...
जोर लावून,बळ एकवटून
हवे तसे वाभाडे काढतात...
अजीर्ण झाले आहे तरीही
नको तेच ताटात वाढतात...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पंढरपूर एम आय डी सी चे लवकरच भूमिपूजन :

## कासेगाव हद्दीत ५४ एकर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित

## पंढरपूर औद्योगिक वसाहतीच्या उभरणीतील महत्वाचा टप्पा : आ. समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांचे यश

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर औद्योगिक वसाहतीसाठी कासेगाव हद्दीतील ५४ एकर जमीन उद्योग मंत्रालयाने 'औद्योगिक क्षेत्र ' म्हणून जाहीर केले आहे. त्यामुळे पंढरपूर एम आय डी सीच्या उभारणीला आता गती येणार आहे. लवकरच midc चे भूमिपूजन होणार असल्याची माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली.

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते, चार प्रमुख वाऱ्या वर उदरनिर्वाह करणारे गाव अशीही पंढरपूरची ओळख आहे. पंढरपूर तालुक्यातील हजारो युवक रोजगाराच्या शोधत पुण्या – मुंबईला जातात. स्थानिक पातळीवर एम आय डी सी असावी अशी मागणी अनेक दशकांपासून केली जात आहे. मात्र आजवर राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी एम आय डी सी मंजूर झाली नाही. बऱ्याच वेळी स्थानिक राजकारणाच्या कुरघोडी मुळे एम आय डी सी उभारणीत खोडा घातला जात होता. परंतु आ. समाधान आवताडे यांनी गेल्या केवळ दोन वर्षात सातत्याने पाठपुरावा करून, कासेगाव हद्दीत एम आय डी सी मंजूर करून घेतली. आणि आज ( दि. २१ ऑगस्ट) पासून कासेगाव हद्दीतील गट नंबर १९४७/४, १९४७/६, १९४७/८ मधील हे क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून उद्योग मंत्रालयाने जाहीर केले आहे. त्यामुळे लवकरच पंढरपूर एम आय डी सी उभारणीचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार आहे. येथील औद्योगिक वसाहतीच्या उभरणीतील महत्वाचा टप्पा पार झाला आहे. आ. समाधान आवताडे यांनी मागील दोन वर्षापासून यासाठी प्रयत्न आणि पाठपुरावा केला आहे.



पंढरपूर तालुक्यात गेल्या दहा वर्षापासून मी सार्वजनिक काम करतोय, या दरम्यान हजारो युवकांनी एम आय डी सी ची गरज बोलून दाखवली. आणि मलाही याची गरज जाणवत होती. सुदैवाने पोटनिवडणुकीत जनतेने आमदार केले..त्यानंतर एम आय डी सी चां विषय मी प्राधान्याने हाती घेतला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री ना.उदय सामंत, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या सहकार्यामुळे लवकरात लवकर हा विषय मार्गी लावता आला याचे समाधान आहे. जागा निश्चित झाली आहे आता लवकरच भूमिपूजन करू
**– आ.समाधान आवताडे**

पंढरपूर शहर आणि तालुक्यात कुशल मनुष्यबळ, चांगली रस्ते कनेक्टीव्हीटी, रेल्वे सेवा, मुबलक पाणी, साखर कारखानदारी, फळ शेती असल्याने उद्योगासाठी पोषक वातावरण आहे..मात्र एम आय डी सी अभावी हजारो युवकांना रोजगार शोधत बाहेर जावे लागत होते. अनेकांना जागेअभावी उद्योग उभा करता आले नाहीत, काही उद्योजक तालुक्या बाहेर निघून गेले. मात्र आता एम आय डी सी मंजूर झाल्याने पंढरपूरच्या उद्योगाच्या विकासाला संधी मिळेल, रोजगार वाढेल
**– बाळकृष्ण सूर्यवंशी,** उद्योजक अनवली, पंढरपूर

कासेगाव हद्दीतील जागेचा प्रस्ताव औद्योगिक विकास महामंडळास पाठवला होता. औद्योगिक विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कासेगाव येथे येऊन जागेची पाहणी केली होती. त्यानंतर आ. आवताडे यांनी उद्योग मंत्रालय, औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सतत पाठपुरावा चालू ठेवला होता.

अखेर आज (दि २१ रोजी) उद्योग मंत्रालयाकडून राज्यपालांच्या आदेशानुसार ५४ एकर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केले आहे. आ. आवताडे यांनी उद्योग मंत्रालयाचे सहसचिव संजय देगावकर यांच्याकडून हा अध्यादेश स्वीकारला आहे. त्यानंतर आवताडे यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांचेही आभार मानले आहेत.

पंढरपूर येथील एम आय डी सी. च्या उभरणीतील कासेगाव हद्दीतील जागा निश्चित केल्यामुळे पंढरपूर तालुक्यातील हजारो बेरोजगार युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळण्यासाठी मदत होणार आहे. शिवाय तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या औद्योगिक विकासाला ही चालना मिळणार आहे.

पंढरपूर येथे अभियांत्रिकी महाविद्यालयांसह चांगल्या उच्च शिक्षण संस्था आहेत. त्यामुळे कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध आहे. भीमा नदी मुळे एम आय डी सी करिता पाणी उपलब्ध आहे. शिवाय पंढरपूर शहर आणि तालुक्यात आता पक्क्या रस्त्याचे जाळे निर्माण झाले आहे. शिवाय रेल्वे सेवा पंढरपूर पर्यंत चालू आहे. त्यामुळे दर्शन एम आय डी सी उभारण्यासाठी पोषक परिस्थिती पंढरपूर मध्ये आहे, मात्र आजवरच्या राजकीय नेत्यांच्या उदासीनतेमुळे हा प्रश्न प्रलंबित राहिला होता.

# भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे इंडस्ट्री कनेक्ट कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरमधील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाने 21 ऑगस्ट 2024 रोजी इंडस्ट्री कनेक्ट कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते, ज्याचा उद्देश शैक्षणिक आणि कॉर्पोरेट जगतामधील संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने होता. कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (T&P) सेलच्या प्रा. सय्यदा निखत अथर यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात करिअरची तयारी वाढवण्यासाठी आणि उद्योग सहकार्य वाढवण्यासाठी धोरणांवर चर्चा करण्यासाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि उद्योग तज्ज्ञांना एकत्र आणले.

या कार्यक्रमाचा उद्देश शैक्षणिक आणि उद्योग यांच्यातील दुवा मजबूत करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरच्या संधी वाढवणे. कार्यक्रमाला सर्व विभागातील II, III, आणि IV वर्षाचे बी.टेक विद्यार्थी उपस्थित होते.



**कार्यक्रमात दोन प्रमुख उद्योग तज्ञ होते:**

- हैदराबादचे जावा फुल स्टॅक डेव्हलपर आणि ट्रेनर श्री अविनाश रेड्डी टी यांनी "प्लेसमेंट ओरिएंटेड प्रोसेस" वर मुख्य भाषण दिले. त्यांच्या सादरीकरणाने विशेषतः आयटी क्षेत्रातील, रोजगाराच्या बाजारपेठेतील उत्क्रांत गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे.
- बेंगळुरू येथील कॉर्पोरेट ट्रेनर आणि आयटी अभियंता श्री भीमाशंकर टी यांनी "संस्था-उद्योग सहयोग" या विषयावर भाषण केले. त्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाला उद्योगाच्या गरजेनुसार संरेखित करण्याच्या महत्त्वावर भर दिला, विद्यार्थी पदवीनंतर रोजगारासाठी चांगले तयार होतील याची खात्री करून.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सय्यद गिलानी पाशा आणि डीन अकादमिक , प्रा. ए.ए. पीरामपल्ली यांच्यासह कार्यक्रमाचे संयोजक प्रा. सय्यद निखत अथर यांनी आयोजित केलेल्या पॅनल डिस्कशनचाही समावेश होता. सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक इंडस्ट्री ॲप्लिकेशन्समधील अंतर भरून काढण्यावर या चर्चेत लक्ष केंद्रित केले गेले, ही थीम विद्यार्थी आणि उपस्थित प्राध्यापक दोघांनाही जोरदार प्रतिसाद देत होती.

आपल्या भाषणात, प्राचार्य डॉ. सय्यद गिलानी पाशा यांनी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले, की ते विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक नोकरीच्या बाजारपेठेसाठी तयार करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी T&P सेलचे कौतुक केले आणि त्यांच्या अंतर्दृष्टी सामायिक केल्याबद्दल उद्योग तज्ञांचे आभार मानले.

विद्यार्थ्यांना संवादात्मक प्रश्नोत्तर सत्रादरम्यान तज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली, जिथे त्यांना करिअर नियोजन, कौशल्य विकास आणि संभाव्य नियोक्त्याच्या अपेक्षा यावर मार्गदर्शन मिळाले.

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून इंडस्ट्री कनेक्ट कार्यक्रमाचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता प्रा. सय्यदा निखत अथर यांच्या आभारप्रदर्शनाने झाली, त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वक्ते, सहभागी आणि T&P सेल टीमचे आभार मानले.

# सोलापूर राज्य परिवहन महामंडळात मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेअंतर्गत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभाग येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी सदर योजना राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने विविध पदासाठी एकूण 188 जागेकरिता (6 महिने करिता प्रशिक्षणार्थी म्हणून) अर्ज मागविण्यात येत आहेत. 12 उत्तीर्ण, आय.टी. आय./ पदविका, पदवीधर/पदव्युत्तर पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांसाठी दि.24 ऑगस्ट 2024 ते 29 ऑगस्ट 2024 या कालावधित अर्ज सादर करण्याचे आवाहन असून, अधिक माहिती करिता विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, बुधवार पेठ, सोलापूर येथे संपर्क करणेबाबत विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांनी कळविले आहे.

# दीड महिने लोटून गेला तरी बेपत्ता मुलींचा तपास नाही

## कुर्डूवाडी पोलिस स्टेशन हद्दीतील प्रकार, पोलिसांना मुली आणी आरोपीचा थांगपत्ता लागेना

**माढा (कटूसत्य वृत्त):-** बदलापूर च्या घटनेने अख्खा महाराष्ट्र हादरला गेला असुन मुलीच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणार आला आहे.महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अश्या घटना कमी होण्याचे नाव घेत नसुन या घटना ताज्या घडत असतानाच सोलापूर जिल्हातील कुर्डूवाडी पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावातुन दोन मुली बेपत्ता झाल्या आहेत.

दिड महिने लोटुन जाऊन देखील कुर्डूवाडी पोलिसांना त्या मुली आणी संबधित आरोपीचा थांगपत्ता लागलेला नसुन राज्यभरात घडत असलेल्या घटनेच्या पाश्र्वभुमिवर कुडूर्वाडी पोलिसांच्या कार्यक्षमतेवरच या निमित्ताने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याबाबत सविस्तर माहिती घेतली असता; कुडूर्वाडी पोलिस स्टेशन हद्दीतील एका गावातुन एक १८ वर्षीय व अन्य अल्पवयिन मुलगी अश्या दोन मुली ११ जुलै ला बेपत्ता झाल्या होत्या.

या दोन्ही मुलीची कुडूर्वाडी पोलीसांत पालकांच्या तक्रारीवरुन १२ जुलैला बेपत्ता झाल्याची नोंद झाली होती.




अल्पवयीन मुलीची बेपत्ता नोंद केल्यानंतर पोलिसांकडुन उशीरा २ ऑगस्ट ला त्या अल्पवयीन मुलीची फुस लावुन पळवुन नेल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे.अज्ञातावर गुन्हाची नोंद देखील झाली आहे.

घटना कुडूर्वाडी पोलिसांत दाखल होऊन जवळपास दिड महिन्यांचा कालावधी लोटुन गेला आहे.तरी देखील पोलिसांना सबंधित मुलीचा व आरोपीचा शोध तसेच घटनेचा तपास लावण्यात यश आलेले नाही.त्यामुळे कुर्डूवाडी पोलिस ठाण्यातील वरिष्ठ अधिकार्यानी सध्याचे राज्यभरातील वातावरण पाहता गाभिर्याने घेऊन मुलीचा आणी आरोपीचा तपास जलदगतीने लावणे गरजेचे आहे. अन्यथा पोलिसांच्या ही संवेदना बोथट झाल्या आहेत की काय ? असेच म्हणावे लागेल.

राज्यभरातील सध्याची स्थिती जर पाहिली तर महिला आणि मुलींसाठी सुरक्षिततेचे वातावरण दिसत नाही अशा स्थितीत मुलींच्या अथवा महिलांच्या संदर्भात अन्यायकारक घटना घडल्या असतील तर पोलीस ठाण्यात आल्यावर पीडित महिला अथवा त्यांचे पालकांकडून सर्वप्रथम तक्रार दाखल करून घेतली पाहिजे. सज्ञान मुलीची बेपत्ता म्हणून नोंद घेता येते मात्र अल्पवयीन मुलीची बेपत्ता झाल्यास फुस लावून पळून नेणे. नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार 137 नुसार फिर्याद तात्काळ दाखल करून घेण्या पोलिसांचे कर्तव्य आहे
**– ॲड पांडुरंग खोत,** माढा न्यायालय

दोन्ही मुली बेपत्ता झाल्याची नोंद आमच्याकडे झाली होती.त्यानंतर यापैकी एक मुलगी अल्पवयीन असल्याने तिला फुस लावुन पळवुन नेल्याची तक्रार आमच्याकडे २ ऑगस्टला दाखल झालेली आहे. आम्ही दोन्ही मुचींचा आणी संशयित आरोपीचा कसुन शोध घेत असुन मोबाईल लोकेशन द्वारे तपास करीत आहेत.
**– सुरेश चिलवार,** पोलिस निरीक्षक, कुर्डूवाडी पोलिस स्टेशन

# टेंभुर्णी येथे बदलापूर प्रकरणी महाविकास आघाडीच्या वतीने काळ्या फित लाऊन मुक निषेध आंदोलन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन अल्पवयीन शालेय बालिकेवर लैंगिक आत्याचार केल्या प्रकरणी व पोलीस प्रशासनाने संशयित आरोपीवर कारवाई करण्यास दिरंगाई केल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने करमाळा चौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अधार्कृती पुतळ्यासमोर बसून काळ्या फित लाऊन मुक निषेध आंदोलन आज सकाळी 11 वाजता करण्यात आले

या निषेधार्थ टेंभुर्णी शहरातील व परिसरातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी सर्वांनी तोंडाला काळी फित व काळे झेंडे हातात घेऊन या घटनेचा शांततेत निषेध नोंदवला.घडलेल्या घटनेच्या विरोधात शहारातील बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला.

असुन सरकारच्या विरोधात मागण्याचे निवेदन टेंभुर्णी पोलीस स्टेशन चे ए पी आय गिरीश जोग,पोसई राजेंद्र डांगे यांना निवेदन देण्यात आले.



या मुक निदर्शनात शिवसेना ठाकरे गटाचे ता.प्रमुख मधूकर देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार तालुकाध्यक्ष औदुंबर देशमुख, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, काँग्रेसचे ता.अध्यक्ष संजय पाटील टेंभुर्णी माजी सरपंच प्रमोद कुटे, टेंभुर्णी शिवसेना शहर प्रमुख सुरेश लोंढे, यांचेही या निषेधार्थ मुख निषेध आंदोलनानंतर भाषणे झाली या मध्ये आरोपीला फाशीची शिक्षेची मागणी केली असून या वेळी सर्वांनी सरकारचा निषेध केला.

या वेळी शिवसेनेचे अमोल धुमाळ,पप्पू पवार, टेंभुर्णी गट प्रमुख भिमराव नांगरे, टेंभुर्णी शहर उपाध्यक्ष प्रशांत सोणवने, संतोष खैरमोडे, युवा सेनेचे किशोर देशमुख, आझाद फाउंडेशनचे अध्यक्ष अझीज शेख, संभाजी ब्रिगेड चे शहर अध्यक्ष सचिन खुळे, सचिन जाधव, चेअरमन विलास देशमुख, रमेश देशमुख, समाधान महाडिक-पाटील, बाबा महाडिक, वडार समाजचे भिमराव बंडगर, जयवंत कोळपे, तेजेस निंबाळकर, संदीप कुटे, काका डावरे, सतीश पवार, नवनाथ महाडिक, दीपक भोसले, सुनील माने, चंद्रकांत कोठावळे, रवींद्र बेंद्रे, संदीप शिंदे, पांडुरंग देशमुख, रणजीत पवार, हनुमंत दिघे, सचिन देशमुख, रमेश चोपडे, प्रवीण जाधव, इम्तियाज सय्यद, सोमनाथ चांदगुडे, दत्तात्रय खडके आदी उपस्थीत होते.

# आ राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शीमध्ये युवा संवाद मेळावा संपन्न





**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागातील युवक बांधवांचा युवा संवाद मेळावा बार्शी शहरातील माऊली लॉन्स येथे भिमा परीवाराचे अध्यक्ष राज्यसभा खासदार धनंजय(मुन्ना)महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत व आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ॲड.रणवीर राजेंद्र राऊत तसेच बार्शी तालुका ग्रामीण भागातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदलापूर घटनेतील आरोपींना त्वरित फाशी द्यावी- जिजाऊ ब्रिगेडची मागणी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** बदलापूर जिल्हा ठाणे येथील आदर्श विद्यालयातील सफाई कामगाराने लहान मुलीवर लैंगिक अत्याचार घडल्याची घटना संपूर्ण देशभर गाजली असून या क्रूर घटनेचा निषेध महाराष्ट्र राज्य जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने, अकलूज येथे करण्यात आला. तसेच या क्रूर घटनेची केस फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीस फाशीची शिक्षा त्वरित करण्यात यावी अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली. तसेच या पुढील काळात अशा प्रकारच्या घटना घडू नये म्हणून महाराष्ट्रातील सर्वच शाळांमध्ये योग्य त्या काळजी घेण्याची सूचना राज्य शासनाच्या स्तरावरून होण्याची मागणी करण्यात आली. तसेच महाराष्ट्र राज्य जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात जाऊन अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याविषयी जनजागृती करण्याचे आश्वासन पुणे विभागीय सचिव सौ वनिता कोरटकर यांनी सांगितले.



सदर वेळी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश संघटक अक्काताई माने, शिवमती वनिता कोरटकर, हेमलता मुळीक, मनोरमा लावंड, शुभांगी क्षीरसागर, अक्षदा माने, आशा सावंत,शारदा चव्हाण, शितल दळवी, हेमलता सांगडे तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या सभासद कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

जिजाऊ ब्रिगेडचे निवेदन अकलूज पोलीस स्टेशनचे वतीने स्वीकारण्यात आले. निवेदन पुढील कार्यवाईस पाठविण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

# राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यास शासनाला भाग पाडू - आडम मास्तर

**फेरीवाल्यांचा भव्य मेळावा संपन्न...!**

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर हे स्मार्ट सिटी मध्ये समाविष्ट झाल्याने सोलापूर शहर वासियांना त्याचा आनंद आहे. पण या शहरामध्ये गोरगरीब नागरीक सुद्धा राहतात. सोलापूर शहर हे ऐकेकाळी गिरणगांव म्हणून महाराष्ट्रात व देशात प्रसिध्द होते. पण सरकारच्या नविन औधोगिक धोरणामुळे शहरातील सर्व सुत गिरण्या व कापड गिरण्या बंद पडल्या त्यामुळे प्रचंड बेरोजगारी वाढली, बेरोजगार कामगार आपले उदरनिर्वाह करण्याकरीता भाजीपाला व फळ-फळावळ इतर साहित्य स्टेशनरी विक्री व चार चाकी हातगाडी फेरीने व्यवसाय व रस्त्याच्या कडेला बसून साहित्या विक्री करणे व रस्त्याच्या बाजूने फुट पाथ वर खोके घालून खोक्यामध्ये व्यवसाय करीत आहे. तरी यांच्यासाठी केंद्राची व राज्य सरकारची राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंतर्गत दिन दयाळ अन्तोदय राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत ही योजना केंद्र सरकारने अंमलात आणलेली आहे. तरी महापालिकेने रस्त्याच्या कडेला व्यवसाय करणारे व खोक्यात व्यवसाय करणारे व फुटपाथ वर व्यवसाय करणारे किंवा आठवडी बाजार व्यवसाय करणाऱ्यांचा महापालिकेच्या वतीने या योजनेचा सर्व्हे होऊन त्यांना ओळखपत्र मिळवून देणे व फेरीवाला विभाग तयार करने याची प्रक्रिया पूर्ण झालेली असताना महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी या योजनेची अंमलबजावणी होत नाही तरी या खोकेधारक व फेरीवाल्यांच्या सरंक्षणासाठी फेरीवाले व खोकेधारकांच्या आर्थिक व सामाजिक स्थैर्य देण्यासाठी राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करण्यास शासनाला भाग पाडू अशा निर्धार ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम यांनी केले.

रविवार दिनांक 25 ऑगस्ट रोजी दत्त नगर येथे सर्व खोके धारक, फेरीवाले चार चाकिवाले, फळ भाजी विक्रेते, व लहान व्यवसाय करण्याऱ्या फेरीवाल्यांचा




भव्य मेळावा सिटू चे राज्य सचिव युसुफ शेख मेजर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

यावेळी महापालिकेकडून 50000/- हफ्ता परतफेड केल्यानंतर एक लाख रुपये कर्ज मंजुर करणे. फेरीवाला परवाना फी 5000/- रुपये असून ती कमीत कमी 500/- रुपये झाली पाहिजे.

फेरीवाला हॉकर्स झोन निश्चित होत नाही तो पर्यंत अतिक्रमण कार्यवाही थांबविण्यात यावी. सोलापूर शहरात मनपाकडून सर्वेक्षण झालेल्या फेरीवाल्यांना व खोकेधारकांना ओळख पत्र देण्यात यावे. सोलापूर शहरातील सर्व खोकेधारक ज्या ठिकाणी व्यापार करीत आहेत त्याच जागेवर छोटे गाळे बांधून देण्यात यावे त्यामुळे महापालिकेच्या महसूलात वाढ होतील. महानगरपालिका अतिक्रम विभागाकडून व तसेच पोलिस विभागाकडून होत असलेली कार्यवाही त्वरीत थांबवावी. अतिक्रमण केलेले आहे ती त्वरीत मोकळी करुन घ्यावी.

दंडाची कार्यवाही करत असताना शंभर रुपये बाँडची अट रद्द करावी. भाजी मंडई येथे दर डोई 25 रुपये ची फी कमी करून ती 5 रुपये करण्यात यावी व प्रत्येक मंडईला दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावी.

महापालिकेकडून 10000/- कर्ज त्वरीत चालु करावे याबाबत सर्व फेरीवाल्यांनी मागण्यांवर साधक बाधक चर्चा केली त्यावर आडम मास्तरांनी शासन दरबारी या मागण्या धसास लावण्याचे आश्वासन दिले.

सिटू चे राज्य महासचिव ॲड एम.एच.शेख यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर ॲड.एम. एच.शेख, युसुफ मेजर, खाजाभाई शेख, जावेद सागरी, म.हनीफ सातखेड, सलीम नमाजी, इसबार खान पठान, अनवर रंगरेज, इरफान शेख, वुडन बागवान, इमाम दर्जी,रामबाबू माने, आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेश दुगाणे, दाऊद शेख, इस्माइल भगवान, मजीद बागवान, अखिल शेख, आसिफ पठाण, दीपक निकंबे, शाम आडम, शहाबुद्दीन शेख, अमोल काशिद, बजरंग गायकवाड, अबूहुरैरा शेख, मुन्ना कलबुर्गी अमीन शेख, फिरोज शेख, हरीश पावर, सिद्राम गायकवाड, राजेश काशिद, रफीक काजी, नितिन गुंजे, नितिन कोडकर, प्रशांत चौगुले, रहीम नदाफ, सुजीत जादव, गंगाराम निंबड़ाकर, अमीन शेख, अरबाज सगरी, जुबेर सागरी आदींनी परिश्रम घेतले.

कॉ.युसुफ मेजर यांनी मेळाव्याची भूमिका व उद्देश स्पष्ट केले.